|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

A' Grade

'NAAC Re-Accredited

( 3rd Cycle )

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

**बातमी क्र.१**

जळगाव दि.२७ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा सन २०१८-१९ चा ३०२.४७ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अधिसभेत मान्यता देण्यात आली. या अर्थसंकल्पात १३.२० कोटी रुपयांची तूट दर्शविण्यात आली आहे.

मंगळवार, दि. २७ मार्च रोजी अधिसभेची बैठक झाली. वित्त व लेखाधिकारी डॉ.बी.डी.कऱ्हाड यांनी अधिसभेत हा अर्थसंकल्प सादर केला. विकासाला चालना देणारा असा हा अर्थसंकल्प असून यामध्ये परिरक्षणासाठी १९९.९९ कोटी रुपये, योजनांतर्गत विकासासाठी रुपये ४६.९३ कोटी आणि विशेष कार्यक्रम/योजनांसाठी ५५.५६ कोटी अशी खर्चासाठी एकूण ३०२.४८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात उत्पन्नासाठीची तरतूद २८९.२८ इतकी असल्यामुळे रुपये १३.२० कोटी इतक्या तुटीचा हा अर्थसंकल्प आहे. खर्चात बचत करुन ही तुट भरुन काढण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला आहे. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विकासाला चालना देणारा असा हा अर्थसंकल्प आहे.

विद्यापीठात शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण व आदिवासी भागातील असून त्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक त्या सुविधा देण्याचा संकल्प या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पाचे वैशिष्टये म्हणजे फलनिष्पत्तीवर आधारीत शिक्षण ही संकल्पना राबविली जाणार असून नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडेशन आणि एआयसीटीई यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार विद्यापीठ प्रशाळा, विभाग आणि परिसंस्थांमधील तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये फलनिष्पत्तीवर आधारीत शिक्षण ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी कार्यशाळा व त्याद्वारे जनजागृती केली जाईल. त्यामुळे चार विद्याशाखांसाठी अंतर्गत गुणवत्ता हमीकक्षासाठी प्रत्येकी २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. उद्योजकता विकासासाठी १० लाख, ज्येष्ठ नागरिक कृतज्ञता निधी म्हणून २ लाख , क्षमता विकास केंद्रासाठी ५० लाख, सायन्स पार्कसाठी २५ लाख अशी तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठात स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी पुणे येथील राष्ट्रीय रसायन प्रयोगशाळेने विकसित केलेली जलशुध्दीकरण यंत्रणा खरेदी करण्यासाठी ३० लाख, विद्यापीठात हरितवाहन खरेदीसाठी ५० लाख तसेच विद्यापीठातील विभागीय उपहारगृहासाठी २५ लाख अशी तरतूद केली गेली. योग अभ्यास केंद्रासाठी १० लाख, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राअंतर्गत प्रशिक्षण, व्याख्याने, वाय-फाय सुविधासाठी १४ लाख आणि स्वतंत्र ग्रंथालयासाठी ६ लाख अशी तरतूद राहिल. जळगाव शहर ते विद्यापीठ प्रवासासाठी बस पास योजना सुरु करण्यात आली आहे. त्या योजनेला राजर्षी छत्रपती शाहू महाराज बसपास सवलत योजना असे नामकरण करण्यात येत असून बसपासच्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम विद्यापीठाकडून अर्थसहाय्य म्हणून विद्यार्थ्यांना देण्यात येईल. त्यासाठी ५ लाखाची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठातील मानव संसाधन विकास व प्रशिक्षण केंद्रासाठी २० लाख तरतूद राहिल.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विद्यापीठाला पंडित दिनदयाळ उपाध्याय अध्यासन मंजूर झाले असून त्यासाठीचा निधी टप्प्या-टप्प्याने उपलब्ध होणार आहे. विद्यापीठातील वसतिगृहात डॉ.आंबेडकर वसतिगृह सहाय्य योजना कार्यान्वित होणार असून त्यासाठी ६ लाख मंजूर करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी थॅलेसिमिया तपासणी शिबिर घेण्यात येईल तसेच श्रमदानातून दत्तक गाव बंधारे, एक झाड - एक विद्यार्थी- एक प्राध्यापक योजना राबविण्यात येणार आहे. प्रयोगशाळा ते जमीन या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना माती परिक्षणाबाबत स्वावलंबी करण्यासाठी

..२..

सर्टिफिकेट कोर्स इन सॉईल टेस्टींग हा अभ्यासक्रम सुरु करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे. तसेच झिरो बजेट नैसर्गिक शेती मॉडेल उभे करण्याचाही मानस आहे. विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद मिळाल्यास आगामी वर्षात प्रायोगिक तत्त्वावर विद्यापीठाच्या वसतिगृहात अन्नपूर्णा विद्यार्थी संचलित सार्वजनिक मेस सुरु करण्यात येणार आहे.

विद्यार्थी कल्याण व विकास योजनेसाठी या अर्थसंकल्पात ९ कोटी ४ लाख अशी तरतूद करण्यात आली आहे. महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी आंतरराष्ट्रीय परिषदा व कार्यशाळांमधील सहभागासाठी ३० लाख, दुरस्थ शिक्षणासाठी २ कोटी ५ लाख, नवीन विद्यापीठ कायदयामुळे स्थापन होणाऱ्या नवीन विभाग व प्राधिकरणाच्या निर्मितीसाठी १ कोटी ८३ लाख तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाने या अर्थसंकल्पात ३८ नाविन्यपूर्ण योजना प्रस्तावित केल्या आहेत. कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजनेसाठी ५० लाख व पेटंट प्रोत्साहन योजनेसाठी २५ लाख रुपयांची तरतूद केली आहे.

डॉ.कऱ्हाड यांनी अर्थसंकल्प मांडल्यानंतर त्यावर चर्चा झाली. त्या आधी नितीन ठाकूर यांनी मांडलेली कपात सूचना चर्चेनंतर मागे घेण्यात आली. या अर्थसंकल्पाचे सर्व सदस्यांनी स्वागत केले. विविध प्रकारच्या नवीन ३८ योजना या अर्थसंकल्पात मांडण्यात आल्या असून त्याद्वारे विद्यापीठ विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करुन सदस्यांनी काही सूचना देखील केल्या. या चर्चेत प्राचार्य ए.टी.पाटील, प्राचार्य आर.एस.पाटील, प्राचार्य सुभाष राणे, प्रा.संजय सोनवणे, प्रा.एकनाथ नेहते, प्रा.संध्या सोनवणे, दिनेश खरात, नितीन ठाकूर, मनिषा चौधरी, दिनेश नाईक, राजेंद्र नन्नवरे, राजेंद्र जाखडी, जी.वाय.पाटील, प्राचार्य पी.पी.छाजेड आदींनी भाग घेतला. चर्चेनंतर सभागृहाने अर्थसंकल्पाला मान्यता दिली.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२७ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव असे नामकरण करण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या घोषणेचे विद्यापीठाच्या अधिसभेने स्वागत करुन या नामकरणाला सर्वानुमते मान्यता दिली.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि.२७ मार्च रोजी अधिसभेची बैठक झाली. या बैठकीत २२ मार्च रोजी मुख्यमंत्र्यांनी विद्यापीठाच्या नामकरणाबाबत केलेल्या घोषणेबद्दल अधिसभा सदस्यांनी आनंद व्यक्त करुन आपल्या भावना मांडल्या. दिनेश खरात यांनी मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेचे अधिसभा सदस्य एकमुखाने स्वागत करीत असल्याचा ठराव मांडला.या ठरावाला डॉ.अजय सुरवाडे यांनी अनुमोदन दिले. प्राचार्य आर.एस.पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च शिक्षण मंत्री विनोद तावडे यांचा अभिनंदन करणारा ठराव मांडला. प्राचार्य लता मोरे यांनी या ठरावाला अनुमोदन दिले. आमदार एकनाथराव खडसे आणि सर्व लोकप्रतिनिधींचे अभिनंदन करणारा ठराव देखील यावेळी मांडण्यात आला. दिनेश खरात व प्रा.संजय सोनवणे यांनी त्याला अनुमोदन दिले. प्राचार्य आर.एस.पाटील यांनी मूल्य व जीवन शिक्षणाचा हा विजय असल्याची भावना व्यक्त केली. दिलीप पाटील यांनी विद्यापीठात बहिणाबाईंच्या नावे स्वतंत्र दालन उभे करावे अशी मागणी केली. मनिषा चौधरी यांनी देखील हा समस्त स्त्री वर्गाचा सन्मान असल्याची भावना बोलून दाखवली. प्रा.संजय सोनवणे यांनी या निर्णयाचे स्वागत करताना अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड बहिणाबाईंनी घातली असे सांगत मानव्यविद्या व आंतरविद्याशाखा

मधील सर्व विषयांचे अभ्यासक्रम विद्यापीठ विभागामार्फत शिकविण्याची मागणी ठरावाद्वारे केली. या ठरावाला डॉ.किशोर कोल्हे यांनी अनुमोदन दिले. यावेळी विष्णू भंगाळे यांनी अभिनंदनाच्या दिलेल्या पत्राचे वाचन अमोल सोनवणे यांनी केले. या विषयावरील चर्चेत सर्व सदस्यांनी भाग घेवून आपला आनंद व्यक्त केला.

विद्यार्थी परिषदेचे सभापती दिगंबर पवार यांनी जिल्हानिहाय युवक महोत्सवाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल विद्यापीठाचे अभिनंदन करणारा ठराव मांडला. त्याला प्रियंका चौधरी हिने अनुमोदन दिले. सर्व प्राधिकरणाच्या निवडणूका पारदर्शीपणे पार पाडल्याबद्दल कुलगुरुंचे व प्रशासनाचे अभिनंदन करणारा ठराव नितीन ठाकूर यांनी मांडला. अमोल मराठे यांनी त्याला अनुमोदन दिले. प्रश्नोत्तराच्या तासात प्रा.संध्या सोनवणे, दिगंबर पवार आणि राजेंद्र जाखडी यांच्या प्रश्नांना प्राचार्य डी.एस.सुर्यवंशी, दिलीप पाटील आणि दीपक पाटील यांनी उत्तरे दिली. प्रा.नितीन बारी यांनी विद्यापीठाचे कामकाज पेपरलेस करण्यावर भर दिला जात असल्याचे प्रा.संजय सोनवणे यांच्या स्थगन प्रस्तावाला उत्तर देताना सांगितले. बैठकीत सत्र पध्दतीवर झालेल्या चर्चेत प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य डी.आर.पाटील, प्राचार्य पी.एम.पवार, प्राचार्य पी.पी.छाजेड यांच्यासह प्राचार्य ए.टी.पाटील, प्राचार्य सुभाष राणे, दिगंबर पवार, प्रा.प्रकाश अहिरराव, प्रा.एकनाथ नेहते. प्रा.गौतम कुवर आदींनी भाग घेतला. अस्मितादर्शचे संपादक व ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर पानतावणे यांना अधिसभेने यावेळी श्रध्दाजंली अर्पण केली. दिलीप पाटील यांनी शोक प्रस्ताव मांडला. प्रा.संजय सोनवणे व प्राचार्य आर.एस.पाटील यांनी अनुमोदन दिले.

---

जा.क्रः उमवि/१६/हस्तदेय/२०१८ दिनांक : २७ मार्च,२०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

North Maharashtra University, Jalgaon

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.२७ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात उद्या बुधवार, दि. २८ मार्च रोजी इरास्मस प्लस अनुदान प्राप्त कॅबसीन प्रकल्पातंर्गत एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठासह भारतातील पाच आणि युरोपियन देशातील (पोलंड, पोर्तुगाल, सायप्रस, स्लोवकिया, बेल्जीयम) अशा दहा संघटीत विद्यापीठांमधील इरास्मस प्लस अनुदानित कॅबसीन प्रकल्पातंर्गत एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते अधिसभागृहात उद्‌घाटन होणार असून पोलंड येथील डॉ.कमिला लुदविकोस्का, सहसंचालक डॉ.केशव तूपे, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा.ए.एम.महाजन यांनी केले आहे. व्यवस्थापन समितीत डॉ.भूषण चौधरी, डॉ.राम भावसार, डॉ.अनिल डोंगरे, डॉ.मनिष जोशी यांचा समावेश आहे.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२७ () राष्ट्रीय गणित दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेत नुकताच झाला.

यावेळी कर्नाटक येथील प्रा.एम.एस.चौधरी, जी.एस.खेडकर, प्रा.व्ही.जी.मिस्कीन, प्राचार्य एम.एम.पवार, विभागप्रमुख एस.आर.चौधरी, डॉ.किशोर पवार आदी उपस्थित होते. यावेळी प्रा.नलिनी पाटील, प्रा.गोतमारे, प्रा.मिस्कीन, प्राचार्य पवार यांनी मनोगत व्यक्त केले. विविध स्पर्धांसाठी प्राचार्य पवार, प्रा.जे.एन.चौधरी, प्रा.कृष्णप्रसाद वप्रा यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. संचालक प्रा.आर.एल.शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक दिपीका पाटील यांनी केले. समारोपाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ.किशोर पवार यांनी केले. शिवानी अहिरे हिने आभार मानले.

---

जा. क्र. उमवि/१६/हस्तदेय/२०१८ — दिनांक : २७ मार्च, २०१८

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी